ePaper

**छ. संभाजीनगरात कंपनीला भीषण आग; 6 कामगारांचा होरपळून मृत्यू!**



| वर्ष - 7 । अंक - 232 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- खूप टॅलेंट आहे, पण टीम जिंकत नाही
- आमच्या पिढीतले कलाकार मेहनती
- अज्ञातांकडून सुरक्षा दलांवर गोळीबार
- बेरोजगारांना नोकऱ्या देणार होते!


www.mahaenews.com । रविवार, दिनांक 31 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# संजोग वाघेरेंच्या हाती शिवबंधन!

## उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेशः मावळ लोकसभा मतदार संघातील समिकरणे बदलणार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मोठा धक्का बसला आहे. पिंपरी चिंचवड मधील अजित पवारांचे निकटवर्तीय माजी महापौर संजोग वाघेरे पाटील यांनी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश केला आहे. मातोश्री येथे वाघेरेंचा पक्षप्रवेश पार पडला आहे.**

मुंबईतील मातोश्री या निवासस्थानी जाऊन संजोग वाघेरे यांनी शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत हा प्रवेश केला आहे. यावेळी वाघेरे भावनिक झाल्याचे पाहायला मिळाले.

यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की, मला आता भाउक आणि घाऊक यातला फरक समजायाला लागला आहे. जे भावनेला किंमत देतात ज्यांच्यात संवेदना आहेत ते आज शिवसनेसोबत आहेत. मावळ लोकसभा जेव्हापासून निर्माण झाला तेव्हापासून शिवसेना तिथे जिंकत आली आहे. तेव्हा बाबर होते. आता मी शब्द दिला होता म्हणू जे आज गद्दार झालेत ते खासदार झालेत. मात्र त्यांनी गद्दारी केली. गद्दारी आणि स्वाभिमानी यातलं फरक म्हंजे संजोग आणि त्या गद्दारांमध्ये आहे.

यावेळी भावना व्यक्त करताना संजोग वाघेरे म्हणाले की, माझ्या सारख्या सर्व सामान्य कार्यकर्त्याला आपण पक्षात प्रवेश दिला. त्याबद्दल मी उद्धव साहेबांचे आभार मानतो. मी शब्द देतो की, येत्या काळात मी पक्षाच्या प्रसारासाठी मी प्रयत्न करीन. लोकांच्या सेवेसाठी कायम उपलब्ध असतो. हे काम पुढे घेऊन जाण्याचं काम मी करणार असल्याचे आश्वासन वाघेरे यांनी उद्धव ठाकरे यांना दिला. संजोग वाघेरे यांच्या शिवसेनेत जाण्याने पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवार यांना मोठा धक्का सहन करावा लागणार आहे. संजोग वाघेरे हे सुरुवातीपासून राष्ट्रवादीशी एकनिष्ठ होते. पवार घराण्याशी त्यांचे घरोब्याचे संबंध होते. मात्र आता पवारांचा एकनिष्ठ ठाकरे गटात गेल्याने मावळ लोकसभेमध्ये आणखी चुरस वाढणार हे नक्की.



> कोरोनाच्या काळात उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनामुळेच आपण या विषाणूला रोखू शकलो. तेव्हाच मी उद्धव ठाकरे यांच्या कामगिरीने प्रभावित झालो होतो. मंडळींनी आता संविधानाच्या बाबतीत चुकीची भूमिका घेतली आहे. अनेक वेगळे मुद्दे काढले आहेत. या सगळ्याचा विचार आमच्या कार्यकर्त्यांसह आम्ही केला. त्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्णय आम्ही घेतला. इथे त्यांना भेटलो, तेव्हा अत्यंत मितभाषी असे व्यक्तिमत्व आम्हाला पाहायला मिळाले. आता ते देतील ती जबाबदारी पार पाडण्यासाठी आम्ही सज्ज आहोत.
>
> **- संजोग वाघेरे**

# ज्यांनी सार्वजनिक निवडणूक लढवली नाही, त्यांच्या आव्हानाला मी भीक घालत नाही!

## खासदार श्रीरंग बारणेंचे संजय राऊतांना प्रत्युत्तर

। पिंपरी चिंचवड ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकीवरून महाराष्ट्रात सर्वच नेते ॲक्टिव्ह झालेत. पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे यांनी शिवबंधन बांधल्याने आता शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांना हरवायचं आहे. आपला मतदारसंघ परत खेचून आणायचा, असे म्हणात संजोग वाघेरे यांच्यावर जबाबदारी टाकली आहे. यावर विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी प्रत्युत्तर दिल असून ज्या व्यक्तीने एकही सार्वजनिक निवडणूक लढवली नाही. अशा व्यक्तींकडे दुर्लक्ष करायचं. कुणी काही बोललं म्हणजे उमेदवार विजयी होत नसतो, असा टोला त्यांनी संजय राऊत यांना लगावला आहे. बारणे पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.**




### पार्थ पवार यांच्यावर बोलणं टाळलं

ऐनवेळी पार्थ पवारला उमेदवारी दिली जाऊ शकते, या प्रश्नावर बोलताना बारणे म्हणाले, भाजपाच्या केंद्रीय आणि शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी मावळ लोकसभेसंदर्भात निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे त्या संदर्भात मी बोलणं योग्य ठरणार नाही. पार्थ पवार यांच्यावर बोलणं बारणे यांनी टाळलं.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, मावळ लोकसभा मतदारसंघातील कामाच्या जोरावर मी निवडणूक लढवणार आहे. मतदारच कोणाला निवडून द्यायचे हे ठरवत असतो. मावळची जनता विकासाला मत देतील, असा विश्वास व्यक्त केला. महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांनी मलाच उमेदवारी द्यायची असं ठरवलं. माझ्यापेक्षा नेतेच तुम्हाला या संदर्भात सांगतील. संजोग वाघेरे यांच्याबद्दल बोलणे योग्य ठरणार नाही. मी कुठल्याही विरोधी पक्षाच्या उमेदवारावर व्यक्तिगत बोलत नाही. २०२४ चा निकाल लागेल तेव्हा तुम्हाला कळेल की श्रीरंग बारणे यांची हॅट्रिक झाली, असे बारणे म्हणाले.

# कन्यादान विरहीत विवाह सोहळा!

## सुधारणावादी विचारांचा आदर्श : पुस्तकाचा आहेर देत मंडळींचे स्वागत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कन्यादान हा भारतीय विवाह संस्कारात अतंत्य महत्वाचा आणि अविभाज्य असा संस्कार आहे. परंतु, कन्या ही वस्तू किंवा गाय, बकरीप्रमाणे प्राणी नाही की जिचे दान करावे व इतरांनी तिच्यावर हक्क प्रस्थापित करावा. तसेच, मी माझ्या आई वडिलांची एकुलती एक अपत्य आहे. त्यामुळे मुलाप्रमाणे मी पण त्यांची जबाबदारी विवाह उपरांत घेणार आहे. त्यामुळे माझे दान होणार नाही आणि कन्या दान संस्कार विहरीत माझे लग्न व्हावे या प्रगतिशील व कालानुरूप सुधारणावादी विचार चि. विशाला विश्राम/शैवलीनी देशपांडे ह्यांची कन्या हिने स्वतःच्या विवाहात अंमलात आणले.**



यशदा पुणे येथील महासंचालक श्री एस .चोकलिंगम, गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था, अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अजित रानडे वधू-वरांना शुभाशीर्वाद देताना.



(उजवीकडून) वधूचे वडील आणि आई श्री. विश्राम व सौ. शैवलिनी देशपांडे, वधू विशाला, वर संकेत आणि त्यांच्या आई सौ. प्रतिभा आणि वडील श्री. संजय बर्वे.

अर्थात, या पुरोगामी विचारांना वर संकेत, त्याची आई प्रतिभा आणि वडील श्री. संजय बर्वे यांनी तेव्हढ्याच उदारमतवादी विचारांनी मनापासून स्वीकारले हे विशेष कौतुक करण्या सारखे आहे. त्यामुळे चि. सौ. का. विशाल आणि चि. संकेत यांचा विवाह सोहळा कन्या दान संस्कार विरहित इतर पूर्ण विवाह संस्कारानी Hayat Regency विमान नगर येथे संपन्न झाला. या

**भारतीय महिलांचे सक्षमीकरण आणि सबलीकरण यासाठी ३३% आरक्षणां व्यतिरीक्त, स्त्रीचे वस्तू म्हणून झालेले समीकरण बदलणे गरजेचे आहे.**

विवाह सोहळ्याचे आणखीन वैशिष्ट्ये म्हणचे पाहुणंना पारंपरिक "लाडू



चिवड्याची " भेट न देता मराठी साहित्यातील विविध लेखकांची आणि विषयावरील पुस्तके भेट म्हणून देण्यात आली. ची. विशाल हि आवड म्हणून पुस्तकांची समीक्षा करते, तिचे Shelficious नावाने ब्लॉग आहे. थोडक्यात शिक्षण हे विवेक दृष्टी आणि प्रगतिशील विचार प्रगल्भ करते याचे ची. सौ. का.विशाला आणि ची. संकेत या उच्च व्यावसायिक शिक्षित दाम्पत्यांनी सहउदाहरण स्पष्ट केले.

### यांनी दिले नव दांम्पत्यास शुभ आशीर्वाद

» या पुरोगामी विवाह सोहायला यशदा पुणे येथील महासंचालक श्री एस .चोकलिंगम, गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था, अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अजित रानडे , भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकारी सर्व श्री. विशाल सोळंखे, श्री. प्रताप जाधव, श्री. मल्लिकानाथ कलशेट्टी, श्री. जावळे, श्री. यशवंत केरुरे, NTPC माजी उप महाव्यवस्थापक श्री. शिरीष मांडवगने, अप्पर जिल्हाधिकारी श्री. मंगेश जोशी, वस्तू व सेवा कर सहायक आयुक्त श्री. प्रकाश पोटे, अप्पर कामगार आयुक्त श्री. पोळ, उप संचालक वित्त श्री. बोरावके, मनशक्ती , विश्वात तथा संशोधक संचालक श्री. गजानन केळकर या सर्वानी नव दांम्पत्यास शुभ आशीर्वाद दिले.

# विद्यापीठात भोंगळ कारभार; सदस्याची तक्रार!

## 'मॅनेजमेंट कौन्सिल'च्या बैठकीत 'लाभा'च्या विषयांनाच मंजुरी

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिलच्या बैठकीत विरोध केलेल्या वादग्रस्त ठरावांना मंजूर दाखविण्यात येत आहे, तर मॅनेजमेंट कौन्सिलच्या बैठका सोयीने घेऊन, त्यातील लाभाच्या विषयांना मंजुरी देण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप खुद्द मॅनेजमेंट कौन्सिलच्याच सदस्याने केला आहे. भ्रष्टाचाराचे आरोप असणाऱ्या विभागांना कोट्यवधींचा निधी वाटप केला जात असल्याची तक्रारही सदस्याने कुलगुरू आणि राज्यपालांकडे केली आहे.**



पुणे विद्यापीठाची मॅनेजमेंट कौन्सिलची बैठक शनिवारी पार पडली. या बैठकीत मॅनेजमेंट कौन्सिलच्या सदस्यांनी प्रशासनावर आरोपांची सरबत्ती केली. त्यामुळे खडाजंगीची परिस्थिती निर्माण झाली होती. या वेळी सदस्य सागर वैद्य यांनी लेटर बॉम्ब टाकून विद्यापीठ प्रशासनातील अधिकारी आणि एका ठरावीक विशिष्ट नामधारी मॅनेजमेंट कौन्सिलच्या सदस्यावर आरोप केले आहेत. या वेळी सदस्य राजेंद्र विखे पाटील, डॉ. नितीन घोरपडे, प्रा. धोंडिराम पवार, बागेश्री मंठाळकर आदी उपस्थित होते.

पुणे विद्यापीठाचे प्रशासन अधिसभा, व्यवस्थापन परिषदेच्या ठरावांना केराची टोपली दाखवून विद्यापीठ कायद्याचा भंग करण्याचा प्रकार वारंवार सुरू आहे. विरोध केलेले वादग्रस्त ठराव मंजूर करून घेतल्याचे दाखवून अधिसभा आणि मॅनेजमेंट कौन्सिलची फसवणूक केली जात आहे. भ्रष्टाचाराचे आरोप होत असलेल्या विभागांना कोट्यवधींचा निधी वाटला जात आहे.

### ठेकेदार पोसण्याचा प्रकार

» विद्यापीठ कामासंदर्भातील अनेक फाइल्स विद्यापीठाच्या प्रशासनाकडे अनेक महिने प्रलंबित आहेत. कॅस शिबिर, प्राध्यापक भरती, नेट सेट स्क्रुटिनी, प्रमाद समितीसह अनेक समितींचे विषय तीन ते चार महिन्यांपासून प्रलंबित आहेत. आगामी काही दिवसांत या प्रकारांमध्ये सुधारणा दिसली नाही, तर नाईलाजाने तीव्र आंदोलन उभारावे लागेल. त्या वेळी प्रत्येक मुद्द्यावरील सखोल पुरावे आणि कागदपत्रे जाहीरपणे मांडू असा इशारा वैद्य यांनी दिला आहे. विद्यापीठातील ठेकेदारी देण्याची पद्धत सदोष आहे. बांधकामाबाबतच्या बैठका नियमित घेतल्या जात नाही. या बैठका तहकूब करून, त्याचे इतिवृत्तही दिले जात नाही. याबाबत अधिसभेने वारंवार लक्ष वेधुनसुद्धा, ऐन वेळी मुदतवाढीचे ठराव आणून काही ठरावीक ठेकेदार पोसण्याचा उद्योग विद्यापीठात सुरू आहे, असा आरोप वैद्य यांनी केला.

# तळवडे दुर्घटनेतील मृतांच्या वारसांचा टाहो!

## घरातली कमावती माणसे गेली, सरकार मदत देणार कधी?...

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तळवडे येथील केकवर लावायच्या शोभेच्या फटाक्याच्या (स्पार्कल कँडल) मेणबत्ती कंपनीतील स्फोटात मृत्यू झालेल्या १४ महिला कामगारांच्या नातेवाइकांना मदतीची प्रतीक्षा आहे. या घटनेला २१ दिवस होऊनही मृतांच्या नातेवाइकांना शासनाने जाहीर केलेली पाच लाखांची मदत अद्याप मिळालेली नाही.**



तळवडे येथील रेडझोन हद्दीत बेकायदा सुरू असलेल्या मेणबत्ती कंपनीत आठ डिसेंबर रोजी स्फोट होऊन आग लागली. या आगीत सहा महिला कामगारांचा जागीच होरपळून मृत्यू झाला, तर दहा जण जखमी झाले होते. यामधील आठ महिलांचा उपचारादरम्यान ससून रुग्णालयात मृत्यू झाला. या घटनेत एकूण १४ महिला कामगारांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर राज्य सरकारच्या वतीने मृतांच्या वारसांना पाच लाखांची मदत जाहीर केली. मात्र, २१ दिवस होऊनही राज्य सरकारने जाहीर केलेली मदत अद्याप मृतांच्या वारसांना मिळालेली नाही. त्यामुळे सरकारने जाहीर केलेली मदत तरी लवकर मिळावी, अशी मागणी नातेवाइकांमधून केली जात आहे. दरम्यान, कारखाना मालकाने अग्निशामक दलासह कोणतीच परवानगी घेतली नव्हती. त्यामुळे या घटनेला कारखाना मालकासह महापालिका प्रशासनही तितकेच जबाबदार असल्याचा आरोप असताना मृतांच्या वारसांना महापालिकेने मदत केलेली नाही.

### लवकर मदत मिळावी, आमचे प्रयत्न सुरू

आग दुर्घटनेत सुरुवातीला नऊ महिलांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या वारसांच्या मदतीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाला तत्काळ प्रस्ताव पाठविला. तो प्रस्ताव राज्य शासनाकडे गेला आहे. पाच मृतांच्या कोणत्या नातेवाइकांना मदत द्यायची यावरून संभ्रम होता. त्यांच्या नातेवाइकांचे प्रतिज्ञापत्र घेतल्यानंतर त्याचा स्वतंत्र प्रस्ताव तयार करून जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठविला आहे. तो प्रस्ताव राज्य शासनाकडे जाईल. नातेवाइकांना लवकरात लवकर मदत मिळावी, यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच पंतप्रधान सहायता निधी मिळविण्यासाठीही पीएम संकेतस्थळावर ऑनलाइन माहिती भरण्यात आल्याचे तहसीलदार अर्चना निकम यांनी सांगितले.

---

# पिंपरी-चिंचवडमध्ये ३० ठिकाणी नाकाबंदी

## मद्यपान करून वाहन चालवल्यास होणार कारवाई


। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नववर्षाच्या पार्श्वभूमीवर मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे. मद्यपान करत वाहन चालविणाऱ्या चालकावर गुन्हा दाखल करून वाहनही जप्त करण्याचा इशारा पिंपरी-चिंचवड पोलिसांनी दिला आहे. शहराच्या विविध भागात रविवारी रात्री उशिरापर्यंत ३० ठिकाणी नाकाबंदी करण्यात येणार आहे.**

नववर्षाच्या स्वागतासाठी अनेक नागरिक घराबाहेर पडून मध्यरात्रीपर्यंत पार्ट्या करतात. यामध्ये काही जण नशा करुन वाहन चालवतात. स्वतः व इतरांच्या जीवास धोका निर्माण करतात. मद्यपान करून वाहन चालविणारे नागरिक पोलिसांच्या तावडीतून सुट शकणार नाही. कारण, शहरात ३० ठिकाणी नाकाबंदी असणार आहे. नाकाबंदीच्या ठिकाणी प्रत्येक वाहनचालकाची कसून चौकशी करण्यात येणार आहे.

ब्रेथ अनालायझर मशीनच्या (मद्यपानाच्या प्रमाणाची चाचणी घेणारे यंत्र) सहाय्याने श्वासाचे नमुने तपासण्यात येणार आहेत. मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या चालकावर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

तसेच वाहनही जप्त करण्यात येणार आहे. त्यामुळे कोणीही मद्यपान करून धोकादायकरीत्या वाहन चालवू नये. नववर्षाचे स्वागत उत्साहाने शांततेने, कायद्याचे पालन करुनच करावे, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी केले आहे.





### धोकादायकरीत्या वाहन चालवू नये

नववर्षाच्या स्वागतार्थ बरेच नागरिक घराबाहेर पडून मध्यरात्री पर्यंत पार्ट्यांचे आयोजन करत असतात. बऱ्याचदा नागरिक नशा करुन वाहन चालवून हुल्लडबाजी करतात. अशांवर पिंपरी-चिंचवड पोलीस करडी नजर ठेवून कोणताही अनुचीत प्रकार घडू नये म्हणून शहरात 30 ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे. नाकाबंदीच्या ठिकाणी प्रत्येक वाहनचालकाची कसून चौकशी करण्यात येणार असून ब्रेथ ॲनालायझर मशीनच्या सहाय्याने श्वासाचे नमुने तपासण्यात येणार आहेत. दारु पिवून वाहन चालवणाऱ्या प्रत्येक वाहन चालकावर गुन्हा दाखल करण्यात येणार असून त्यांचे वाहन अटकावून ठेवण्यात येणार आहे. कोणीही नशा करुन अथवा धोकादायकरीत्या वाहन चालवू नये. तसेच नववर्षाचे स्वागत उत्साहाने परंतु शांतपणाने, कायद्याचे पालन करुनच करावे व शांतता राखण्याच्या दृष्टीने आपले योगदान द्यावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड पोलीसांच्या वतीने करण्यात आले आहे.

---

# कर संवादमध्ये मालमत्ता धारकांच्या शंकाचे निरसन!

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



मालमत्ता हस्तांतरण कसे करायचे? पिंपरी- ऑनलाईन मालमत्ता हस्तांतरण कसे करायचे, घर महिलेच्या नावे असेल तर कर आकारणीमध्ये किती सूट मिळते, त्यासाठी काय कागदपत्रे लागतात या सारख्या अशा विविध शंकाचे निरसन करसंवादमध्ये कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांच्यासह त्यांच्या विभागातील अधिका-यांनी 'ऑन दी स्पॉट' आज (शनिवारी) केले. तसेच मालमत्ता सर्वेक्षणासाठी सहकार्य करावे असे आवाहनही करण्यात आले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या जनसंवाद सभेच्या धर्तीवर करसंकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांच्या संकल्पनेतून ऑनलाईन आणि ऑफलाईन कर संवाद घेण्यात येत आहे. यामध्ये शहरातील नागरिक घर बसल्या आपले प्रश्न मांडून सोडून घेत असल्यामुळे कर संवादला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या संवादमध्ये शहरात सध्या सुरू असलेल्या मालमत्ता सर्वेक्षणासाठी नागरिकांनी सहकार्य करावे. हे सर्वेक्षण मालमत्ता धारकांच्या कसे फायद्याचे आहे, याचे महत्व पटवून देण्यात आले. त्यानुसार सर्वेक्षणामध्ये आकारणी न झालेल्या मालमत्ता कर कक्षेत आणून सर्व मालमत्तांना सुलभ क्रमांक देऊन मालमत्तेची माहिती अद्ययावत करण्यात येणार आहे. मालमत्ता सर्वेक्षणात युपीक (UPIC) आयडी दिल्यामुळे भविष्यात महापालिकेच्या सर्व सेवा, शासनाचे इतर विभाग यांच्यात समन्वय राहण्यासाठी उपयुक्त होणार आहे. नागरिकांना 'डिजी लॉकर'च्या धर्तीवर मालमत्तेसंदर्भातील महत्त्वाची कागदपत्रे 'प्रॉपर्टी लॉकर'च्या माध्यमातून सुरक्षित ठेवण्याची सुविधा, मालमत्तेची अचूक (PCMC) मोजणी करून माहिती व पत्ता अद्ययावत करणे, मालमत्तेची विश्वासर्हता वाढून खरेदी, विक्री व्यवहार सुलभ होण्यास मदत, मालमत्ता कर आकारणीबाबत संपूर्ण माहितीचे संकलन करून मालमत्ते अंतर्गत असणाऱ्या रेन वॉटर हार्वेस्टिंग, सोलर पॉवर, घनकचरा विलगीकरण आदी सुविधांबाबत प्रत्यक्ष सर्वेक्षण करून जागेवरच मिळणाऱ्या सवलतीबाबत नोंद करण्यात येणार आहे.

# ये 'मोह मोह'के धागे..



भूमिका

**सरत्या वर्षातील काही मोजक्या महत्त्वाच्या घटनांतील एक लोभस, मोहमयी घटना कोणती आणि मध्य प्रदेशचे शिवराज सिंह चौहान यांचा एक लाडला, पण दुर्लक्षित निर्णय कोणता.. हे दोन प्रश्न एकत्र विचारले तर येणारी उत्तरं निश्चित ठोकळेबाज असतील.**

यातल्या काही उत्तरांत असेल अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड वगैरे देशप्रमुखांच्या छातीत धडकी भरवणारं किंवा त्यांना खाली मान घालायला लावेल असं आपलं 'जी २०' परिषदेचं आयोजन. किंवा या आपल्या परिषदेला घाबरून चीनचे क्षी जिनपिंग यांनी तीकडे पाठ फिरवणं. किंवा जागतिक विज्ञान विश्वाला हादरवून टाकणारं आपलं 'चांद्रयान' यश. किंवा आशियाई स्पर्धातली भारतीयांची पदक लयलूट. आणि शिवराज सिंह चौहान म्हणजे 'लाडली बेहना'! अनेकांना तर या दोन प्रश्नांची सांगड घालणंही जड जाईल. तर या दोन प्रश्नांचं उत्तर आहे मध्य प्रदेशचे (आता माजी) मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मोहाच्या फुलांपासून बनलेल्या मद्यास 'राज्य मद्या'चा दर्जा देणं आणि त्या राज्यातल्या पंचतारांकित हॉटेलांत या अस्सल भारतीय मद्याची विक्री सुरू होणं. ही यंदाची फार म्हणजे फारच प्रेरणादायी कथा! सरत्या वर्षात मध्य प्रदेशातल्या ताज, मेरियट हॉटेलातल्या पाहुण्यांना नाव न सांगता एक पेय दिलं गेलं. त्यापासनं काही कॉकटेल्स बनवली



गेली. तीही पाजली गेली. तीन-चार महिने हा प्रयोग चालला. या प्रयोगातल्या पाहुण्यांची निरीक्षणं नोंदवली गेली. हे प्यायल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी कसं वाटलं वगैरे तपशील घेतला गेला. चौहान सरकार श्वास रोखून या प्रयोगांच्या निकालाकडे पाहात होतं. आणि ऑगस्ट महिन्यात दोन्ही हॉटेलांनी हातातले प्याले उंचावून हे यश साजरं केलं. हे यश होतं मोहाचं मद्य आनंदानं स्वीकारलं गेलं, त्याचं. त्या हॉटेलांतल्या परदेशी पाहुण्यांनीही हे प्याले भरभरून आणि मागून मागून घेतले. शिवराज सिंह चौहान यांना धन्य धन्य वाटलं असेल. आपल्या राज्यातल्या भिंड, माडिया वगैरे आदिवासींचं हे कौशल्य जगानं 'पोटात' घ्यावं यासाठी त्यांचे प्रयत्न होते. ते अखेर 'तीर्थले'! पण एक शंका: बिचाऱ्या शिवराज सिंह मामाजींनी हा आनंद कसा साजरा केला असेल? त्यांच्या पक्षात असं चषक उंचावून आनंद साजरा करायला सक्त मनाई असणार. (अर्थात त्या राज्यातल्या यशस्वी निवडणुकांनंतर चौहान यांचं जे काही झालं ते पाहता त्यावेळी तरी दु:ख बुडवायला त्यांनी आपल्या निर्णयाचं फळ (खरं म्हणजे फळाची) चाखलं(ली) असेल का? असो) पण ही मोहाची झाडं ही काही खास मध्य प्रदेशचीच मक्तेदारी नाही. आपल्याकडे तर ती कुठेही आढळतात. शेजारच्या कर्जत-नेरळ पट्ट्यात तर मोहाच्या झाडांची जंगलं सापडतील. तशी सगळीच झाडं प्रेम करावी अशीच असतात. पण मोहाचं मोहात पाडतं. घनदाट पानांचं. शिशिरात ती पडून गेली की तांबूस तुरे उगवतात. त्यांना पानांचा आकार येतो. विंदांनी म्हटल्याप्रमाणे 'तुझ्या गळयाला दंश करावा' असं त्या मस्तानीच्या गळयासारख्या पारदर्शी पानांकडे पाहून आपल्यालाही वाटेल; इतकी ती गोड दिसतात. मग त्यांचं पोपटीपण. आणि मग यथावकाश हिरवं होणं. आणि या झाडाला बहर येतो तेव्हा तर हे सौंदर्य अगदी महकून जातं. आसपास सगळीकडे नुसता आंबेमोहोरासारखा सुंगध भरून राहातो. जाम नावाची निर्गुण-निराकार-निरुपद्रवी फळं कशी दिसतात? त्या रंगाची ही मोहाची फुलं. दुप्पट आकाराच्या मोगऱ्याच्या फुलाइतकी मोठी. ती टपाटप पडतात. त्या जागी फळं. ती आली की राघूंचे थवेच्या थवे मोह-मुक्कामी! आदिवासी, कातकरी या मोहाच्या फळांची भाजी करतात. आणि फुलांचं? खास भारतीय म्हणता येईल असं मद्य. गोव्यातल्या फेणीशी नातं सांगणारं. अलीकडचा सहज अधिक खर्च करायला लावणारा शब्द म्हणजे ऑर्गनिक. हे मद्य पाण्यासारखंच दिसतं. फुलं उकळवून ते करतात. आदिवासी, कातकरी बायकाही अगदी हे सहज पितात. पानांच्या द्रोणातून. पूर्वी मुंबई-पुणे प्रवासात करवंदं कशी पानांच्या द्रोणातनं विकायला यायची. तसे हे द्रोण. पुढे चोच आल्यासारखं एक पान टोचलेलं. त्यातून ती प्यायची. दिसायला ती अगदी साधी. पण तिच्या (म्हणजे मोह-मद्याच्या) दिसण्यावर जाणं धोक्याचं. पिताना घशाखाली एक आगीची लकेर उतरत जाते आणि नंतर मात्र तोंडात फुलाचा स्वाद धुमसतो. या मोहाचं 'पाणी'च वेगळं. ते इतकं उफाडयाचं आणि घायाळ करणारं की साहेबांना या पेयावर बंदी घालावी लागली.

## संपादकीय »

### विनोदची 'राय'!

***जवळपास शंभराहून अधिक वर्षांचे जुने दूरसंचार कायदे बदलून त्या जागी नवा, सर्वसमावेशक दूरसंचार कायदा आणण्याच्या नरेंद्र मोदी सरकारच्या प्रयत्नांचे स्वागत.***

जवळपास शंभराहून अधिक वर्षांचे जुने दूरसंचार कायदे बदलून त्या जागी नवा, सर्वसमावेशक दूरसंचार कायदा आणण्याच्या नरेंद्र मोदी सरकारच्या प्रयत्नांचे स्वागत. या कायद्याचा प्रस्ताव आणि जवळपास ५६ पानांचे परिशिष्ट नुकतेच संसदेत सादर झाले. या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्यात आणखी काही काळ जाईल. सध्या ज्या पद्धतीने विरोधी पक्षीय खासदार निलंबित होत आहेत ते पाहता यावर कोणतीही साधक-बाधक चर्चा न होता सदर विधेयकाचे रूपांतर झटपट कायद्यात होईलही. तसे झाल्यास 'इंडियन टेलिग्राफिक ॲक्ट १८८५', 'इंडियन वायरलेस टेलिग्राफी ॲक्ट १९३३' आणि 'टेलिग्राफ वायर्स (अनलॉफुल पझेशन) ॲक्ट १९५०' हे तीन कायदे कालबाह्य होतील. त्यांच्या जागी स्वतंत्र, नवाकोरा दूरसंचार कायदा अस्तित्वात येईल. त्याची गरज होतीच.

**कर्नाटक रक्षणा वेदिके' या कन्नड भाषकांच्या हक्कासाठी लढणाऱ्या संघटनेने हिंसक आंदोलन सुरू करताच कर्नाटक सरकारने राजधानी बंगळूरुसह राज्यातील सर्व व्यापारी आस्थापनांच्या पाट्यांवरील ६० टक्के जागेत कानडी भाषेचा वापर करण्याची सक्ती करण्याचा निर्णय जाहीर केला.**

# पाट्यांच्या राजकारणाचे कानडी वळण

कानडी सक्तीसाठी आता अध्यादेश जारी केला जाणार आहे. कर्नाटकात सध्या पाट्यांवर ५० टक्के कानडी तर उर्वरित ५० टक्के जागेत अन्य कोणत्याही भाषेत लिहिण्याची मुभा होती. पण कानडीला प्राधान्य मिळाले पाहिजे या मागणीसाठी गेले दोन दिवस बंगळूरुमध्ये वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी विविध आस्थापनांच्या पाट्यांना लक्ष्य केल्यावर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या सरकारने कानडीला प्राधान्य देण्याचा निर्णय लगेचच घेतला. राजधानी बंगळूरुसह राज्यात सर्वत्र पाट्यांवर ६० टक्के जागेत कानडी मजकूर लिहिण्याची सक्ती करण्याच्या आदेशाची २८ फेब्रुवारीपासून अंमलबजावणी केली जाईल, असे सिद्धरामय्या यांनी स्पष्ट केले. अर्थात आस्थापनांवरील पाटी अथवा फलकाच्या भाषेबाबतचा आग्रह हा मुद्दा काही मराठी भाषकांसाठी नवीन नाही. महाराष्ट्रात मराठी पाट्या किंवा मराठीच्या वापरासाठी शिवसेनेने १९८०च्या दशकात आंदोलन



केले होते. पण त्याची तत्कालीन कॉंग्रेस सरकारने फारशी दखल घेतली नाही. २००९ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी राज ठाकरे यांच्या मनसेने आस्थापनांवरील पाट्यांवरील मराठी भाषेच्या सक्तीसाठी आंदोलन केले. त्यासाठी मनसेने 'खळ्ळ खट्याक' म्हणजेच तोडफोड करताच दुकानांवर काही प्रमाणात मराठीत पाट्या दिसू लागल्या. पण तेव्हाही मनसेला सरकारचे पाठबळ मिळाले नाही. याउलट बंगळूरुमध्ये कन्नड भाषेतील पाट्यांसाठी जेमतेम दोन दिवस आंदोलन होताच सिद्धरामय्या सरकारने त्याची तात्काळ दखल घेतली. या दोन दिवसांच्या हिंसक आंदोलनाबाबत 'बायकॉन'च्या किरण मुझुमदार-शॉ, 'इन्फोसिस'चे माजी संचालक मोहनदास पै यांच्यापासून अनेक मान्यवरांनी नापसंती व्यक्त केली. एका उद्योजकाने तर अशीच परिस्थिती राहिल्यास बंगळूरुमधून अन्यत्र व्यवसाय हलविण्याचा इशारा दिला. तरीही सिद्धरामय्या यांच्या कॉंग्रेस सरकारने आंदोलकांपुढे सरळसरळ नमते घेतले. हेच महाराष्ट्रात घडते तर इथले तत्कालीन कॉंग्रेसचे राज्यकर्ते उगाचच प्रादेशिकत्वाचा शिक्का बसायला नको म्हणून गप्प बसणे पसंत करीत असत. दिल्लीला काय वाटेल याची त्यांना अधिक चिंता असायची. पण आता मात्र पुढचा मागचा विचार न करता मुख्यमंत्री सिद्धरामय्या हे कानडी भाषेसाठी लगेच पुढे सरसावले. तमिळनाडूत तमिळ, आंध्र प्रदेशात तेलुगु या स्थानिक भाषांना पाट्यांवर प्राधान्य मिळाले पाहिजे हे त्या त्या राज्यांचे धोरण आहे. तमिळनाडू सरकारने तमिळ भाषेत पाटी नसल्यास आकारण्यात येणाऱ्या दंडात वाढ केली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बेरोजगारांना नोकऱ्या देणार होते!

## कोल्हेंना दिलेल्या आव्हानावरून राऊतांचा पवारांना इशारा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमोल कोल्हे यांनी काढलेल्या 'शेतकरी आक्रोश मोर्चा'ची सांगता सभा पुण्यात पार पडली. या सभेला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेसचे नेते, बाळासाहेब थोरात, खासदार संजय राऊत खासदार सुप्रिया सुळे आणि महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते. यावेळी संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना लक्ष्य केलं आहे.**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'शिरूरमधून आमचा उमेदवार निवडून आणणारच' असा निर्धार व्यक्त करत अमोल कोल्हेंना आव्हान दिलं होतं. या विधानाचा धागा पकडून संजय राऊतांनी अजित पवारांची नक्कल करत इशारा दिला आहे. संजय राऊत म्हणाले, "मी एक वक्तव्य ऐकलं, 'काहीही झाले तरी मी तुम्हाला पाडणारच...' पण, आमच्या पाडा पाडीच्या खेळात पडला, तर पहिले तुम्ही पडाल... नाव घेऊन बोलायचं असतं, आमच्यात दम आहे. 'हवा बोहोत तेज चल रही है, अजितराव... टोपी उड जायेगी."शेतकऱ्यांचे पाच, सहा प्रश्न घेऊन अमोल कोल्हे आणि सुप्रिया सुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे गेले असते, तर 'रामलल्लाचे दर्शन मोफत करून देऊ', असं सांगितलं असतं. दोन कोटी बेरोजगारांना नोकऱ्या देणार होते. पण, त्यावरही 'रामलल्लाचे दर्शन मोफत घडवू,' हेच उत्तर आहे," असं म्हणत संजय राऊतांनी भाजपावर हल्लाबोल केला आहे. "महाराष्ट्राचा स्वाभिमान आणि अस्मिता सरकारनं दिल्लीच्या वाटेवर पायपुसण्यासारखी टाकून ठेवली आहे. पाय पुसायचा आणि पुढे जायचं... आज महाराष्ट्र आणि शेतकरी लुटला जात आहे. महाराष्ट्र आणि मुंबईनं देशाचे पोट भरायचा. पण, महाराष्ट्रात येणारा प्रत्येक उद्योग गुजरातला पळवला जातोय.



मराठी माणसाच्या भाग्याचं आणि कष्टाचं एकाच राज्यात जातोय. त्यापेक्षा गुजरातला एकदाच सोन्यानं मढवून टाका," अशी टीका संजय राऊतांनी भाजपावर केली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे (Sharad Pawar Group) आमदार अमोल कोल्हे (Amol Kolhe) यांच्या आक्रोश मोर्चात ठाकरे गटाचे संजय राऊतांनी (Sanjay Raut) भाजपवर हल्लाबोल केला. राम मंदिरासाठी मी आतापर्यंत दहा वेळी सीबीआयच्या कोर्टासमोर उभा राहिलोय, तुम्ही काय मला सांगताय, असा थेट वार संजय राऊतांनी भाजपवर केला. यावेळी संजय राऊतांनी खासदार सुप्रिया सुळे (Supriya Sule) आणि अमोल कोल्हे (Amol Kolhe) यांचा निलंबित असा देखील उल्लेख करत मिश्किल टीप्पणी केली. राज्यात महाविकास आघाडीची सत्ता येणार असा विश्वास देखील यावेळी संजय राऊतांनी व्यक्त केलाय. सर्व प्रश्नांना एकच उत्तर श्रीरामाचं दर्शन फ्री, असा खोचक टोला देखील राऊतांनी लगावला आहे. मोदींच्या सगळ्या गॅरंट्यांवर एकच गॅरंटी आहे, ती म्हणजे मोदी वापस नही आयेगा, असा बोचरा वार संजय राऊतांनी केलाय. आपल्याला त्याची मशीन नाही दुकानचं बंद करायचं आहे, असं राऊतांनी म्हटलं. संजय राऊतांनी यावेळी अजित पवारांची देखील मिमिक्री केली. काहीही झालं तरी अमोल कोल्हेंना पाडणारच असा वक्तव्य अजित पवारांनी केलं होतं.

### बाळासाहेब नसते तर मोदी नसते

» एक काळ होता, आम्ही अभिमाने सांगायचो की हा महाराष्ट्र आधार या भारताचा. आज हा महाराष्ट्र लुटला जातोय. या महाराष्ट्राने देशाचं पोट भरलं अनेक वर्ष. आमचा गुजरातचा विकास होण्यावर आक्षेप नाही, देशाचा विकास व्हायला हवा. तुम्ही आमचे उद्योग न्याल, पण मराठी माणसाचं मनगट आणि धैर्य कसं न्याल. हिमालयाने साद घातली की हा सह्याद्री हा महाराष्ट्र त्याच्या मदतीला धावून जातो. त्या सह्याद्रीशी अशाप्रकारे खेळण्याचा प्रयत्न करु नका, असा इशारा देखील राऊतांनी केला आहे. असं म्हणतात की मोदींनी सगळं विकलं. ओएनजीसी विकलं, हे विकलं पण त्यांनी काही गोष्टी खरेदी देखील केल्या. मोदींनी कोर्ट खरेदी केलं. त्यावर ते आता देश चालवतात, असं म्हणत संजय राऊतांनी पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला. बाळासाहेब ठाकरे तेव्हा वाजपेयींना म्हणाले होते की, मोदी गए तो गुजरात गया पण आता मोदी आए तो देश गया अशी स्थिती आहे. इव्हीएम मशीन नसेल तर भाजप ग्रामपंचायत देखील जिंकू शकणार नाही. ही सगळी इव्हीएमची ताकद आहे. कारण त्यांची युती ही फक्त ईव्हीएमसोबत आहे, असा दावा संजय राऊतांनी केलाय.असं म्हणतात की मोदींनी सगळं विकलं. ओएनजीसी विकलं.

याच वक्तव्याचा उल्लेख संजय राऊतांनी त्यांच्या भाषणादरम्यान केला. यावर त्यांनी म्हटलं की, आमच्या पाडापाडीच्या खेळात पडाल तर पहिलं तुम्ही पडला. नाव घेऊन थेट बोलायचं असतं आणि तो दम आमच्यात आहे. हवा बोहत तेज चल रही हे, टोपी उड जायेगी अजितराव, असा टोला देखील राऊतांनी अजित पवारांना लगावला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी हा मोर्चा काढण्यात आला आहे. त्यामध्ये अगदी काही साध्या मागण्या करण्यात आल्यात. पण या मागण्या घेऊन जर अमोल कोल्हे आणि सुप्रिया सुळे हे अमित शाह किंवा नरेंद्र मोदी यांच्याकडे गेले असते तर त्यांना म्हटलं असतं की, रामलल्ला का दर्शन फ्री मे करावायेंगे. दोन कोटी बेरोजगारांना नोकरी देणार होते, त्यावरपण यांच्याकडे एकच उत्तर की रामलल्ला का दर्शन फ्री करवायेंगे, असं राऊतांनी म्हटलं.

# वंदे भारत ट्रेन लातूरच्या कोचमध्ये बनवली जाणार

## लातूर व मराठवाड्यासाठी ही अभिमानाची बाब : देवेंद्र फडणवीस

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आज जालना रेल्वे स्थानकावरून जालना- मुंबई वंदे भारत एक्स्प्रेसचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM NARENDRA MODI) यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. दरम्यान, याचवेळी या रेल्वेने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जालना ते छत्रपती संभाजीनगर (CHHATRAPATI SAMBHAJI NAGAR) दरम्यानचा प्रवास केला.**

यावेळी बोलतांना फडणवीस यांनी महत्वाची घोषणा देखील केली आहे. "संपूर्ण भारतीय बनावटीची ही ट्रेन पुढील काळात लातूर (Latur) येथील कोचमधून बनवण्यात येणार आहे. लातूर व मराठवाड्यासाठी ही अभिमानाची बाब आहे," असे फडणवीस म्हणाले. जालना येथील उद्घाटनाच्या कार्यक्रमस्थळी बोलतांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "जालना येथून आज वंदे भारत ही आधुनिक भारताची ट्रेन सुरू झाली आहे. याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे मनःपूर्वक आभार. वंदे भारत रेल्वे ही प्रगत राष्ट्रातील सर्व अत्याधुनिक सुविधांनीयुक्त रेल्वे प्रमाणे आहे. महाराष्ट्रात सध्या सहावी वंदे भारत ट्रेन जालन्यातून



सुरू झाली आहेत. याबद्दल केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव व केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचेही आभार व्यक्त करतो. संपूर्ण भारतीय बनावटीची ही ट्रेन पुढील काळात लातूर येथील कोचमधून बनवण्यात येणार आहे. लातूर व मराठवाड्यासाठी ही अभिमानाची बाब आहे. सध्या 160 प्रति तास किलोमीटरने जाणारी ही ट्रेन दोन वर्षात 250 प्रति तास किलोमीटरने धावेल. महाराष्ट्रात सध्या रेल्वेच्या पायाभूत सुविधांची रुपये एक लाख सहा हजार कोटींची कामे सुरु आहेत. यावर्षी 13 हजार कोटी रुपये राज्याला मिळाले आहेत. अशाप्रकारे रेल्वेचा अभूतपूर्व विस्तार करण्यात येत

### या रेल्वेची 530 प्रवाशी क्षमता

» संभाजीनगर- नाशिक-ठाणे ते मुंबई असा या रेल्वेचा प्रवास असणार असून, प्रवाशांना अत्याधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याचा रेल्वेचा मानस आहे. या रेल्वेची 530 प्रवाशी क्षमता असून एकुण 8 डब्बे जोडले आहेत. भारतामध्ये वंदे भारत रेल्वेंची संख्या 34 झाली आहे. मनमाड ते छत्रपती संभाजीनगर या दरम्यानच्या रेल्वे दुहेरीकरणासाठी जवळपास 1 हजार कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मान्यता मिळाली आहे.

असल्याचे फडणवीस म्हणाले. याचवेळी बोलतांना केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे म्हणाले की, "मराठवाड्यातील नागरिकांना राजधानी मुंबई येथे कामानिमित्ताने जाण्याची उत्तम सोय व्हावी या उद्देशाने जालना येथून वंदे भारत रेल्वेचा आज शुभारंभ करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर पासून ते जालना दरम्यानचे इलेक्ट्रीकचे काम पूर्ण झाले असल्याने जलद, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासासाठी वंदे भारत रेल्वे सुरु करता आल्याने समाधान वाटत आहे.

# राजस्थानमध्ये मंत्रीपदाचे ॲडव्हान्स बुकिंग!

## पोटनिवडणूक जिंकण्यापूर्वीच मंत्रीपदाची घेतली शपथ

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राजस्थानमधील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने (भाजप) माजी मंत्री सुरेंद्रपाल सिंह टीटी करनपूर मतदारसंघातून पोटनिवडणूक रिंगणात असतानाही मंत्रिमंडळात समाविष्ट केलं आहे. या जागेसाठी 5 जानेवारीला मतदान होणार आहे. राजस्थानमध्ये शनिवारी (30 डिसेंबर) 22 आमदारांनी मंत्रीपदाची शपथ घेतली.**

सुरेंद्रपाल सिंह टीटी यांच्या मंत्रीपदी नियुक्तीवर काँग्रेसने टीका केली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष गोविंद सिंग दोतासरा म्हणाले की, "पक्ष ही बाब निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणून कारवाईची मागणी करेल." दोतासरा यांनी म्हटले आहे की, "देशातील कदाचित ही पहिलीच घटना असेल जेव्हा निवडणुकीपूर्वी भाजपने आपल्या उमेदवाराला मंत्री केले असेल, काँग्रेस ही बाब निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणून कारवाईची मागणी करेल." भाजप मतदारांना भुरळ घालू शकते, परंतु काँग्रेस पक्ष करणपूरची जागा मोठ्या फरकाने जिंकेल. राजस्थान मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा राजधानी जयपूरमधील राजभवनात पार पडला. यादरम्यान 12 आमदारांनी कॅबिनेट मंत्री, पाच राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि पाच राज्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यपाल कलराज मिश्रा यांनी राजभवनात आमदार आणि सुरेंद्रपाल सिंह टीटी यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. सुरेंद्रपाल सिंह टीटी यांनी राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) म्हणून शपथ घेतली. विधानसभा निवडणुकीत सुरेंद्रपाल सिंह हे टीटी करनपूर मतदारसंघातून भाजपचे उमेदवार होते. उमेदवाराच्या मृत्यूनंतर या जागेवरील निवडणूक पुढे ढकलण्यात आली होती. राज्यातील विधानसभेच्या 200 पैकी 199 जागांसाठी 25 नोव्हेंबरला मतदान झाले होते. त्याचा निकाल 3 डिसेंबरला लागला. करणपूर गंगानगर




मतदारसंघाची निवडणूक काँग्रेसचे उमेदवार आणि तत्कालीन आमदार गुरमीत सिंह कुन्नर यांच्या निधनामुळे पुढे ढकलण्यात आली होती. या जागेसाठी आता 5 जानेवारीला मतदान होणार आहे. 8 जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे. भाजपकडून माजी मंत्री सुरेंद्रपाल हे उमेदवार आहेत, तर काँग्रेसने कुन्नर यांचे पुत्र रुपिंदर सिंह यांना उमेदवारी दिली आहे. करणपूर विधानसभा मतदारसंघात एकूण 249 मतदान केंद्रे आहेत. 6 डिसेंबरपर्यंत येथे 2 लाख 40 हजार 826 मतदार होते. सध्या विधानसभेत भाजपचे 115 तर काँग्रेसचे 69 आमदार आहेत.

भजनलाल शर्मा यांनी 15 डिसेंबर रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यांच्यासोबत नवनिर्वाचित आमदार दिया कुमारी आणि प्रेमचंद बैरवा यांना उपमुख्यमंत्री करण्यात आले. सुरेंद्रपाल सिंह टीटी यांच्या मंत्रीपदी नियुक्तीवर काँग्रेसने टीका केली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष गोविंद सिंग दोतासरा म्हणाले की, "पक्ष ही बाब निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणून कारवाईची मागणी करेल." दोतासरा यांनी म्हटले आहे की, "देशातील कदाचित ही पहिलीच घटना असेल जेव्हा निवडणुकीपूर्वी भाजपने आपल्या उमेदवाराला मंत्री केले असेल, काँग्रेस ही बाब निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणून कारवाईची मागणी करेल." भाजप मतदारांना भुरळ घालू शकते, परंतु काँग्रेस पक्ष करणपूरची जागा मोठ्या फरकाने जिंकेल. राजस्थान मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा राजधानी जयपूरमधील राजभवनात पार पडला. यादरम्यान 12 आमदारांनी कॅबिनेट मंत्री, पाच राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि पाच राज्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यपाल कलराज मिश्रा यांनी राजभवनात आमदार आणि सुरेंद्रपाल सिंह टीटी यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. सुरेंद्रपाल सिंह टीटी यांनी राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) म्हणून शपथ घेतली.राजस्थानमधील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने (भाजप) माजी मंत्री सुरेंद्रपाल सिंह टीटी करनपूर मतदारसंघातून पोटनिवडणूक रिंगणात असतानाही मंत्रिमंडळात समाविष्ट केलं आहे.

### 25 नोव्हेंबरला झाले होते मतदान

राजस्थान मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा राजधानी जयपूरमधील राजभवनात पार पडला. यादरम्यान 12 आमदारांनी कॅबिनेट मंत्री, पाच राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि पाच राज्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यपाल कलराज मिश्रा यांनी राजभवनात आमदार आणि सुरेंद्रपाल सिंह टीटी यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. सुरेंद्रपाल सिंह टीटी यांनी राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) म्हणून शपथ घेतली. विधानसभा निवडणुकीत सुरेंद्रपाल सिंह हे टीटी करनपूर मतदारसंघातून भाजपचे उमेदवार होते. उमेदवाराच्या मृत्यूनंतर या जागेवरील निवडणूक पुढे ढकलण्यात आली होती. राज्यातील विधानसभेच्या 200 पैकी 199 जागांसाठी 25 नोव्हेंबरला मतदान झाले होते. त्याचा निकाल 3 डिसेंबरला लागला. करणपूर गंगानगर मतदारसंघाची निवडणूक काँग्रेसचे उमेदवार आणि तत्कालीन आमदार गुरमीत सिंह कुन्नर यांच्या निधनामुळे पुढे ढकलण्यात आली होती.

# अज्ञातांकडून सुरक्षा दलांवर गोळीबार

## मणिपूरमधील मैतेई बंडखोर गटाने शस्त्रे टाकली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ईशान्येकडील मणिपूर राज्य अद्यापही धुमसतंच आहे. आज शनिवारी दुपारी ३.५० वाजता मणिपूरच्या मोहरेहमध्ये अज्ञात बंदूकधारी आणि पोलीस कमांडो यांच्यात जोरदार गोळीबार झाला. सुरक्षा दलांवर हल्ला करण्यासाठी आयईडी आणि इतर स्फोटकांचा वापर केला. या हल्ल्यानंतर राज्य सुरक्षा दलांनी हल्लेखोरांनाही प्रत्युत्तर दिले.**

प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, अज्ञात बंदूकधाऱ्यांनी मोरेहून की लोकेशन पॉइंट (KLP) कडे जात असताना पोलीस कमांडो घेऊन जाणाऱ्या वाहनांना लक्ष्य केले. तर, “इम्फाळ-मोरेह मार्गावरील एम



चहनोऊ गाव विभाग ओलांडताना एका पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला झाला. या हल्लात पोलीस कर्मचारी जखमी झाला. जखमी पोलीस कर्मचाऱ्यावर ५ आसाम रायफल्स कॅम्पमध्ये उपचार सुरू आहेत”, असे अधिकाऱ्याने सांगितले. प्राथमिक अहवालानुसार, न्यू मोरेह प्रवेशद्वार आणि एम चहनो गावाजवळ अंदाधुंद गोळीबार सुरू होता. मोरेह येथेही दोन घरांना आग लागल्याची माहिती सूत्रांनी दिली. गेल्या महिन्याच्या सुरुवातीला मणिपूरच्या कांगपोकपी जिल्ह्यात अज्ञात सशस्त्र लोकांनी केलेल्या हल्ल्यात एक भारतीय राखीव बटालियन (IRB) जवान आणि एक नागरिक ठार झाला होता. हा हल्ला हाराओथेल आणि कोबशा गावांदरम्यान झाला. मेईतेई समुदायाच्या अनुसूचित जमातीच्या (एसटी) मागणीच्या निषेधार्थ राज्याच्या पहाडी जिल्ह्यांमध्ये ‘आदिवासी एकता मार्च’ आयोजित करण्यात आल्यानंतर ३ मे २०२३ पासून ईशान्येकडील मणिपूर राज्य वांशिक हिंसाचाराच्या गर्तेत आहे. मणिपूरमधील बंडखोरांचा सर्वात जुना सशस्त्र गट युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंटने (यूएनएलएफ) हिंसेचा मार्ग सोडत मुख्यधारेत येण्याचा निर्णय घेतला आहे. संघटनेने आपली शस्त्रं टाकत शांतता करारावर स्वाक्षरी केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांच्या एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर याबाबतची माहिती दिली आहे. या घटनेचं वर्णन करताना गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे की, आपण हा एक ऐतिहासिक टप्पा ओलांडला आहे. यूएनएलएफने आज नवी दिल्लीत शांतता करारावर स्वाक्षरी केल्यामुळे ईशान्येत कायमस्वरुपी शांतता प्रस्थापित करता येणार आहे. मोदी सरकारच्या प्रयत्नांना मोठं यश मिळालं आहे.

# २२ जानेवारीला अयोध्येत येऊ नका!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

अयोध्येत बांधण्यात आलेल्या भव्य अशा राम मंदिराचे २२ जानेवारी रोजी उद्घाटन केले जाणार असून प्रभू रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. या कार्यक्रमासाठी अयोध्यानगरी सज्ज झाली आहे. आज (दि. ३० डिसेंबर) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विविध प्रकल्पांचे उदघाटन आणि भूमिपूजन करण्यात आले. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून राम मंदिराचा विषय सगळीकडे चर्चेत आहे. राम मंदिराशी निगडित छोट्या छोट्या घटनांनाही माध्यमांमध्ये प्रसिद्धी मिळत आहे. त्यामुळे देशभरात राम मंदिराबद्दल उत्सुकता निर्माण झाली असून २२ जानेवारी रोजी अनेक भाविक अयोध्येत येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर २२ जानेवारी रोजी राम भक्तांनी अयोध्येत येऊ नये, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना करावे लागले. प्राणप्रतिष्ठा सोहळा ‘याची देही, याची डोळा’ पाहण्यासाठी आजूबाजूच्या जिल्ह्यातील आणि उत्तर प्रदेशमधील भाविक जमा होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अयोध्यामधील हॉटेल, गेस्ट हाऊस आतापासूनच बुक करण्यात आले आहेत. ट्रेन आणि बस यांचेही आरक्षण काढण्यात आले आहे. गर्दीचा अंदाज घेऊन पोलिस प्रशासन सर्व खबरदारीचे उपाय राबवत आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले, “मी देशातील सर्व जनतेला प्रार्थना करतो. तुम्हा सर्वांना २२ जानेवारी रोजी अयोध्येत येऊन या सोहळ्याचे साक्षीदार होण्याची उत्सुकता असेल. पण प्रत्येकाला इथे त्याच दिवशी येणे शक्य नाही, हे तुम्ही सर्व जाणता.

# कधीकाळी निर्मात्यांची रांग लागायची अन् आता भीक मागायची वेळ

दरवर्षी मुंबईत अनेक लोक बॉलिवूडमध्ये (BOLLYWOOD) काम करण्यासाठी आणि अभिनयक्षेत्रात करिअर करण्यासाठी येत असतात, पण यात मोजक्याच लोकांना यश मिळते. अनेकजण अपयश सहन करू शकत नाहीत. काही जण अपयश मिळाल्यानंतर पैसे कमावण्याचा वेगळा मार्ग अवलंबतात. आज अशा एका प्रसिद्ध अभिनेत्रीबद्दल जाणून घेऊयात जिने एकेकाळी सिनेसृष्टीत विशेष स्थान निर्माण केलं होतं. पण नंतर तिला पोटभरण्यासाठी भीक मागावी लागली. भोजपुरी सिने- अभिनेत्री मिताली शर्माच्या करिअरच्या सुरुवातीचे चित्रपट खूप लोकप्रिय झाले होते. ज्यामुळे निर्माते आणि दिग्दर्शकांनी तिच्याकडे इतर अभिनेत्रींपेक्षा जास्त लक्ष दिले. जेव्हा मितालीचे चित्रपट बॉक्स ऑफिसवर सतत फ्लॉप ठरले, तेव्हा चित्रपट निर्माते तिला चित्रपटात कास्ट करत नव्हते. एक वेळ अशी आली की मितालीला काम मिळणे पूर्णपणे बंद झाले. ती अपयश सहन करू शकली नाही. तिच्या आर्थिक आणि मानसिक



स्थितीवर परिणाम झाला.मितालीवर रस्त्यावर भीक मागायची वेळ आली होती. तिला जगण्यासाठी चोरी देखील करावी लागली होती. रिपोर्ट्सनुसार, मिताली शर्माने मुंबईतील (MUMBAI) लोखंडवाला येथे भीक मागायला सुरुवात केली होती. रस्त्यात चोरी करताना मितालीला पोलिसांनी पकडलं होतं. मितालीला मुंबई पोलिसांनी अटक केली होती. महिला पोलिसांनी जेव्हा मितालीला बेड्या ठोकण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिने आधी शिवीगाळ केली आणि नंतर पळून जाण्याचा प्रयत्न केला. मिताली शर्मा ही दिल्लीची आहे. तिने मॉडेलिंग क्षेत्रात देखील काम केलं. अभिनेत्री बनण्याच्या इच्छेने मिताली ही घर सोडून मुंबईत आली. मुंबईत काही चित्रपटात काम केल्यानंतर आणि मॉडेलिंग क्षेत्रात काम केल्यानंतर तिला पुढील काही महिने चांगल्या भूमिका मिळू शकल्या नाहीत. आर्थिक अडचणींचा मितालीच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम झाला. जेव्हा पोलिसांनी मिताली शर्माला अटक करून पोलिस स्टेशनला नेले तेव्हा मितालीनं सर्वात आधी जेवण मागवले होते. रिपोर्टनुसार, पोलिसांनी मितालीला ठाण्यातील मानसिक आश्रयामध्ये दाखल केले.

## पूरग्रस्तांसाठी विजय आला धावून!

तमिळ सुपरस्टार थलापथी विजय सध्या चांगलाच चर्चेत आहे. कॅप्टन विजयकांत यांच्या अंतिमदर्शनाच्या वेळी एका अज्ञात इसमाने विजयवर चप्पल फेकली. यावर विजयकडून कोणतीही प्रतिक्रिया आली नाही. अशातच विजय पूरग्रस्तांसाठी मदत करताना दिसला. विजयचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. आज शनिवारी तुतिकोरिन विमानतळावर विजय दिसला. थुथुकुडी आणि तिरुनेलवेली जिल्ह्यातील पूरग्रस्त रहिवाशांना मदतीचा हात देण्यासाठी विजय शहरात आला होता. विजयचे अनेक फोटो आणि व्हिडिओ त्याच्या फॅन क्लबने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केले आहेत. विजयने पुराचा गंभीर परिणाम झालेल्या कुटुंबांना मदत सामग्रीचे वाटप केले. व्हायरल झालेल्या फोटोंमध्ये विजय स्थानिकांशी आपुलकीने संवाद साधताना दिसत आहे. "थलपथी विजय तुतीकोरीन येथील पुरामुळे बाधित झालेल्या लोकांना मदत साहित्य देण्यासाठी घटनास्थळी पोहोचला आहे," असं ट्विट X वर विजयच्या एका फॅन पेजने शेअर केलंय. तमिळनाडूमध्ये अतिवृष्टीमुळे नाश केला. विशेषत: थुथुकुडी आणि तिरुनेलवेली जिल्ह्यांमध्ये पूरामुळे मोठं नुकसान घडलं.

## 'त्रिशा' करणार कमबॅक!



साऊथमधील प्रसिद्ध अभिनेत्री म्हणून त्रिशाची ओळख आहे. तिचा चाहतावर्गही मोठा आहे. सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असणाऱ्या त्रिशाचा आणि थलपती विजयचा लिओ नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यालाही प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. आता मिळालेल्या माहितीनुसार, त्रिशा ही तब्बल तेरा वर्षांच्या ब्रेकनंतर बॉलीवूडमध्ये इंट्री करणार असल्याची माहिती आहे. साऊथमधील सर्वाधिक पॉप्युलर आणि मानधन घेणारी अभिनेत्री म्हणूनही त्रिशाचे नाव घेतले जाते. काही दिवसांपूर्वी एका वेगळ्या प्रकरणामुळे ती चर्चेत आली होती. तिच्या सहकारी कलाकारानं मन्सूर अली खाननं तिच्यावर आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. त्यामुळे त्रिशानं थेट कोर्टात धाव घेतली होती. कोर्टानं देखील मन्सूरला चांगलेच फटकारले होते. या सगळ्यात त्रिशानं मन्सुरनंही माफी मागितल्याचे दिसून आले आहे. १३ वर्षांच्या अंतरानं त्रिशा बॉलीवूडमध्ये चमकणार आहे. मीडिया रिपोर्टनुसार, त्रिशा ही विष्णु वर्धन यांची पुढील फिल्म ती मुख्य भूमिकेत दिसणार आहे. त्या चित्रपटामध्ये ती च क्क सलमान खानसोबत दिसणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. अजुन या चित्रपटाची अधिकृतपणे घोषणा झालेली नाही. मात्र ती लवकरच होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्रिशाच्या भूमिकेविषयी सांगायचे झाल्यास तिच्या गेल्या काही चित्रपटांना प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यात लिओचा मोठा वाटा आहे. तिच्या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवरही मोठी कमाई केली होती. २०१० मध्ये त्रिशानं अक्षय कुमारच्या खट्टा मिठा मध्ये काम केले होते. एका राजकीय विषयावर आधारित हा चित्रपट होता. त्यातील तिच्या भूमिकेचे कौतुकही झाले होते. सध्या त्रिशाच्या आगामी प्रोजेक्टविषयी सांगायचे झाल्यास, ती विदामुयार्ची नावाच्या तमिळ चित्रपटामध्ये दिसणार आहे. मल्याळम चित्रपट आयडेंटीटी नावाच्या चित्रपटातही तिची महत्वाची भूमिका आहे. त्यानंतर ती मणिरत्नम यांच्या ठग लाईफ नावाच्या चित्रपटामध्ये झळकणार आहे. कोर्टानं देखील मन्सूरला चांगलेच फटकारले होते. या सगळ्यात त्रिशानं मन्सुरनंही माफी मागितल्याचे दिसून आले आहे.

## आमच्या पिढीतले कलाकार मेहनती

बॉलीवूडमध्ये बेबो म्हणून लोकप्रिय असणाऱ्या करिनाची गोष्टच वेगळी आहे. तिनं अभिनयानं एक वेगळे स्थान प्रेक्षकांच्या मनात निर्माण केले आहे. करिनानं आता ओटीटीवर डेब्यू केलं असून त्याची चर्चा होत आहे. याशिवाय तिनं नवी पिढी आणि जुनी पिढीतील कलाकार यांच्याविषयी केलेलं वक्तव्य लक्ष वेधून घेताना दिसत आहे. करिनानं त्या मुलाखतीमध्ये तब्बू आणि राणी मुखर्जी यांचे कौतुक केले आहे. या दोन्ही अभिनेत्रींनी आपल्या अभिनयानं प्रेक्षकांना जिंकून घेतले आहे. इंडियन फिल्म इंडस्ट्रीमधील सर्वात प्रतिभाशाली अभिनेत्री म्हणून राणी आणि तब्बूकडे पाहिले जाते. असेही तिनं म्हटलं. तर नव्या कलाकारांच्या तुलनेत जुन्या कलाकार हे अधिक मेहनती असल्याची प्रतिक्रिया तिनं यावेळी दिली. तब्बूविषयी बोलताना करिना म्हणाली की, तब्बू ही भारतीय फिल्म इंडस्ट्रीमधील सर्वाधिक लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिच्या वयाविषयी कुणीही कधीही प्रश्न विचारत नाही. ती केवळ प्रेक्षकांचे मनोरंजन कसे करता येईल याचा विचार करत असते. शेवटी आमची बांधिलकी ही प्रेक्षकांचे मनोरंजन क से करता येईल याच्याशी असते. तिथं तुमचे वय महत्वाचे नाही तर भूमिका जास्त महत्वाची ठरते. यावेळी करिनानं सध्याच्या पिढीतील नव्या दमाच्या कलाकारांविषयी मोठी प्रतिक्रिया दिली आहे. त्यामुळे ती चर्चेत आली आहे. करिना म्हणते, मी आता जे काही बोलणार आहे त्याविषयी माफी मागते. पण मला एक सांगायचे आहे की, अजुनही आमच्या काळातील अभिनेते नव्या कलाकारांपेक्षा चांगले काम करत.



## हृतिकची एक्स वाईफ बॉयफ्रेंडसोबत वेकेशनला

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता हृतिक रोशनची (HRITHIK ROSHAN) एक्स वाईफ सुझान खान (SUSSANNE KHAN) ही अनेकदा तिचा बॉयफ्रेंड अरसलान गोनीसोबत स्पॉट होते. नवीन वर्षाच्या सेलिब्रेशनसाठी आणि वेकेशन एन्जॉय करण्यासाठी सुझान आणि अरसलान हे मुंबईच्याबाहेर जाण्यासाठी शनिवारी सकाळी मुंबई विमानतळावर पोहोचले. पण यादरम्यान असे काही घडले की, सुझान आणि अरसलान यांना परत घरी परतावे लागले. नवीन वर्षाच्या स्वागतासाठी आणि वेकेशन एन्जॉय करण्यासाठी सुझान आणि अरसलान हे मुंबईबाहेर जाण्यासाठी शनिवारी सकाळी विमानतळावर पोहोचले. त्यांचे एअरपोर्टवरील अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका व्हिडीओमध्ये सुझान खान आणि अरसलान गोनी हे एअरपोर्टच्या गेटवर कागदपत्रे दाखवताना दिसले. सुझानकडे तिची सर्व कागदपत्रे आहेत पण अरसलान कदाचित त्याचा पासपोर्ट घरी विसरला आहे. त्यामुळे अरसलानकडे पासपोर्ट नसल्याने दोघेही माघारी परतले. सुझान आणि अरसलान यांचे मुंबई विमानतळावरील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. सुझान आणि अरसलान यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या विमानतळावरील व्हिडीओला कमेंट करुन अनेकांनी त्यांना ट्रोल केलं.

# खूप टॅलेंट आहे, पण टीम जिंकत नाही!

## कसोटी मालिका : इंग्लंडच्या माजी कर्णधाराची भारतावर टीका

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर सेंच्युरियनमध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीत भारताचा एक डाव आणि 32 धावांनी पराभव झाला. यासह टीम इंडियाचे दक्षिण आफ्रिकेत प्रथमच कसोटी मालिका जिंकण्याचे स्वप्न भंगले. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत भारतीय संघाच्या पराभवानंतर, इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉनने शुक्रवारी सांगितले की, भारतीय क्रिकेट संघ आपली प्रतिभा आणि उपलब्ध संसाधनांनुसार निकाल मिळवू शकलेला नाही. वॉन म्हणाला की, गेल्या दशकात भारताला एकही आयसीसी ट्रॉफी जिंकता आलेली नाही, त्यामुळे त्याची कामगिरी विशेष नाही.**



ऑस्ट्रेलिया आणि पाकिस्तान यांच्यात मेलबर्न येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यादरम्यान एका क्रीडा वाहिनीवरील चर्चेदरम्यान वॉनने ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज मार्क वॉ याला एक प्रश्न विचारला: क्रिकेटच्या बाबतीत भारत हा जगातील सर्वात कमी कामगिरी करणारा संघ आहे असे तुम्हाला वाटते का? यावर उत्तर देताना वॉन म्हणाला, 'भारतीय संघाने अलीकडच्या काळात फारसे काही जिंकलेले नाही. मला वाटते की त्यांचा संघ हा कमी कामगिरी करणारा संघ आहे. ते काहीही जिंकत नाहीत. शेवटच्या वेळी त्यांनी स्पर्धा कधी जिंकली होती? त्यांच्याकडे असलेल्या टॅलेंटने त्यांनी आणखी काही साध्य करायला हवे होते. ऑस्ट्रेलियात मालिका जिंकण्यासाठी भारताचे प्रयत्न खूप चांगले होते, मात्र विश्वचषकाच्या अंतिम फेरीत भारताला चांगली कामगिरी करता आली नाही, असे वॉनने मान्य केले. तो म्हणाला, 2018-19 आणि 2020-21 मध्ये ऑस्ट्रेलियात दोनदा विजय मिळवणे विलक्षण आहे. पण गेल्या काही विश्वचषकांमध्ये तो कुठेच नाही, गेल्या काही T20 विश्वचषकांमध्ये तो कुठेच नाही. सेंच्युरियनमध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात भारताला एक डाव आणि 32 धावांनी पराभव स्वीकारावा लागला होता. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. टीम इंडियाने पहिल्या डावात 245 धावा केल्या होत्या. केएल राहुलने 137 चेंडूत 14 चौकार आणि 4 षटकारांच्या मदतीने 101 धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेसाठी कागिसो रबाडा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला, त्याने 5 बळी घेतले. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात 408 धावा केल्या आणि 163 धावांची मोठी आघाडी घेतली. डीन एल्गरने 287 चेंडूंचा सामना करत 28 चौकारांसह 185 धावा केल्या. तर मार्को जॅन्सनने 11 चौकार आणि 1 षटकाराच्या मदतीने नाबाद 84 धावा केल्या. भारताकडून पहिल्या डावात जसप्रीत बुमराहने चार आणि मोहम्मद सिराजने दोन बळी घेतले. त्यानंतर दुसऱ्या डावात भारताचा डाव 131 धावांवर आटोपला. भारताकडून दुसऱ्या डावात केवळ विराट कोहलीलाच चमकदार कामगिरी करता आली. कोहलीने 82 चेंडूंत 12 चौकार आणि 1 षटकाराच्या मदतीने 76 धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून नांद्रे बर्गरने चार आणि मार्को जॅन्सनने तीन बळी घेतले. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत भारतीय संघाच्या पराभवानंतर, इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉनने शुक्रवारी सांगितले की, भारतीय क्रिकेट संघ आपली प्रतिभा आणि उपलब्ध संसाधनांनुसार निकाल मिळवू शकलेला नाही. वॉन म्हणाला की, गेल्या दशकात भारताला एकही आयसीसी ट्रॉफी जिंकता आलेली नाही, त्यामुळे त्याची कामगिरी विशेष नाही.

ऑस्ट्रेलिया आणि पाकिस्तान यांच्यात मेलबर्न येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यादरम्यान एका क्रीडा वाहिनीवरील चर्चेदरम्यान वॉनने ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज मार्क वॉ याला एक प्रश्न विचारला: क्रिकेटच्या बाबतीत भारत हा जगातील सर्वात कमी कामगिरी करणारा संघ आहे असे तुम्हाला वाटते का? यावर उत्तर देताना वॉन म्हणाला, 'भारतीय संघाने अलीकडच्या काळात फारसे काही जिंकलेले नाही. मला वाटते की त्यांचा संघ हा कमी कामगिरी करणारा संघ आहे. ते काहीही जिंकत नाहीत. शेवटच्या वेळी त्यांनी स्पर्धा कधी जिंकली होती? त्यांच्याकडे असलेल्या टॅलेंटने त्यांनी आणखी काही साध्य करायला हवे होते.

### आफ्रिकेकडून पराभव : मायकेल वॉन

ऑस्ट्रेलियात मालिका जिंकण्यासाठी भारताचे प्रयत्न खूप चांगले होते, मात्र विश्वचषकाच्या अंतिम फेरीत भारताला चांगली कामगिरी करता आली नाही, असे वॉनने मान्य केले. तो म्हणाला, 2018-19 आणि 2020-21 मध्ये ऑस्ट्रेलियात दोनदा विजय मिळवणे विलक्षण आहे. पण गेल्या काही विश्वचषकांमध्ये तो कुठेच नाही, गेल्या काही T20 विश्वचषकांमध्ये तो कुठेच नाही.दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर सेंच्युरियनमध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीत भारताचा एक डाव आणि 32 धावांनी पराभव झाला. यासह टीम इंडियाचे दक्षिण आफ्रिकेत प्रथमच कसोटी मालिका जिंकण्याचे स्वप्न भंगले. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत भारतीय संघाच्या पराभवानंतर, इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉनने शुक्रवारी सांगितले की, भारतीय क्रिकेट संघ आपली प्रतिभा आणि उपलब्ध संसाधनांनुसार निकाल मिळवू शकलेला नाही. वॉन म्हणाला की, गेल्या दशकात भारताला एकही आयसीसी ट्रॉफी जिंकता आलेली नाही, त्यामुळे त्याची कामगिरी विशेष नाही.

# श्रीलंका क्रिकेट बोर्डाने घेतला मोठा निर्णय!

## एकदिवसीय आणि टी-20 संघांना मिळाले दोन नवे कर्णधार

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**श्रीलंका क्रिकेट बोर्डाने दासुन शनाकाकडून एकदिवसीय आणि टी-२० संघाचे कर्णधारपद काढून घेतले आहे. बोर्डाने कुसल मेंडिसला एकदिवसीय संघाचा कर्णधार आणि स्टार अष्टपैलू खेळाडू वानिंदू हसरंगा याची टी-२० संघाचा कर्णधार म्हणून नियुक्ती केली आहे. श्रीलंका क्रिकेट बोर्डाने झिम्बाब्वेविरुद्ध घरच्या मर्यादित षटकांच्या मालिकेसाठी संभाव्य खेळाडूंची यादी जाहीर केली आहे.**

ज्यामध्ये दासुन शनाका संघाचा भाग आहे, परंतु त्याला कर्णधारपदावरून हटवण्यात आले आहे. श्रीलंका क्रिकेट बोर्डाने एकदिवसीय मालिकेसाठी २१ खेळाडूंची नावे जाहीर केली आहेत. कुसल मेंडिसकडे वनडे संघाचे कर्णधारपद सोपवले आहे. त्याचप्रमाणे टी-२० संघाचे कर्णधारपद वानिंदू हसरंगाकडे सोपवण्यात आले आहे. झिम्बाब्वे संघ ६ जानेवारीपासून घरच्या मैदानावर श्रीलंकेविरुद्ध मर्यादित षटकांची मालिका खेळणार आहे. ३ एकदिवसीय सामन्यांची मालिका ६ जानेवारीपासून सुरू होणार



आहे. तसेच १४ जानेवारीपासून टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. दासुन शनाकाने शेवटच्या वेळी विश्वचषकात कर्णधारपद भूषवले होते. विश्वचषक २०२३ च्या केवळ दोन सामन्यांनंतर शनाकाला दुखापतीमुळे संपूर्ण स्पर्धेतून बाहेर रहावे लागले होते. त्याच्या जागी कुसल मेंडिसने संपूर्ण स्पर्धेचे नेतृत्व केले. शनाकाने आपला शेवटचा आंतरराष्ट्रीय सामनाही वर्ल्ड कपमध्ये पाकिस्तानविरुद्ध खेळला होता. कुसल मेंडिस (कर्णधार), चारिथ असलंका (उपकर्णधार), पथुम निसांका, अविष्का फर्नांडो, सदिरा समरविक्रामा, चमिका करुणारत्ने, जेनिथ लियांगे, वानिंदू हसरंगा, महेश तीक्षाना, दिलशान मदुशंका, दुष्मंथा चमीरा, दुनिथ वेललागे, प्रमोद मदुशन, असिथा फर्नांडो, अकिला धनंजय, जेफ्री वेंडरसे, चमिका गुणसेकरा. श्रीलंका क्रिकेट बोर्डाने दासुन शनाकाकडून एकदिवसीय आणि टी-२० संघाचे कर्णधारपद काढून घेतले आहे. बोर्डाने कुसल मेंडिसला एकदिवसीय संघाचा कर्णधार आणि स्टार अष्टपैलू खेळाडू वानिंदू हसरंगा याची टी-२० संघाचा कर्णधार म्हणून नियुक्ती केली आहे.

### श्रीलंकेचा प्राथमिक टी-20 संघ

वानिंदू हसरंगा (कर्णधार), चरित असलंका (उपकर्णधार), पथुम निसांका, सदिरा समरविक्रमा, दासून शनाका, कामिंदू मेंडिस, चमिका करुणारत्ने, कुसल मेंडिस, महेश टीक्षाना, दिलशान मदुशंका, दुष्मंथा चमीरा,दुनिथ वेल्लालगे, प्रमोद मदुशन, अकिला धनंजय, जेफ्री वेंडरसे, अँजेलो मॅथ्यूज, धनंजय डी सिल्वा, कुसल परेरा

MahaENews
The fight for truth... the right to democracy!
www.mahaenews.com | SUNDAY, 30th DECEMBER 2023 | Digital Edition | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# Distinct Wedding sans 'Kanya-Dan' & Books replaces sweets

## » highly professionally qualified couples says 'Daughters' cannot be equated with an object






**Pune : Representative**

**Indian weddings are flamboyant and pompous ceremony, but rarely does one dare to reform the wedding rituals, followed meticulously through ages. However time had changed, highly professionally qualified couples like Vishala & Sanket performed their wedding without the ' Kanya Dan' rituals, held recently at Grand Hayat Pune.**

'Daughters' cannot be equated with an object nor can they be compared with animals such as cow or goat etc to be donated (Dan) in a ceremony. "I am the only child of my parents and desire to take their responsibility just like a son, post marriage," feels Vishala, ~~hence she did not wanted her~~ parents Vishram & Shaivalini to give her in Dan, i.e.donate her as per Kanya- Dan wedding ritual.

The most interesting and appreciative part is that the groom Mr. Sanket, his mother Pratibha and father Sanjay Barve willingly with equal forwardness accepted this request and so the wedding was performed sans Kanya-Dan ritual. The another most unique feature in this wedding was that the guest while returning were given Marathi Books instead of the traditional Ladoo- Chiwada (Sweet & spicy) packets, The books were on varied subjects written by many famous Marathi Writers. Vishala as a hobby peruses blog writing and has her own Book blog "Shelficious".

> The true women empowerment and enhancement cannot be achieved with only 33% reservation, simultaneously we need to reform all such practices which equates women with an object. Blessings from dignitaries

This rather distinct wedding was blessed by The Director General of Yashada Mr .S. Chokalingam, Chancellor of Gokhale Institute of Politics and Economics, Dr. Ajit Ranade, Senior IAS officers Mr Vishal Solanki, Pratap Jadhav, Malikanath Kalshetty, H.K. Jawale, Yashwant Kerure, Additional Collector Mangesh Joshi, NTPC Dy. General Manager Shirish Mandaogane, Joint Commissioner Gst Shri Prashant Pote, Additional Commissioner Labour Shailendra Pol. Dy. Director Finance Borawake, and Rajendra Kurade. Gajanan Kelkar, Trustee and Research Director of Mana-Shakti Kendra Lonavala, all blessed the couple.



